सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७
नगर परिषदा/नगर पंचायतींमध्ये नेमण्यात आलेले मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांनी वेळोवेळी पाठवावयाच्या अहवालांबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ३०/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९/११/२०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे वगळून)

विषय:- नगर परिषदा/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक- २०१६-१७
मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांचे अहवाल...

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१४/१०/२०१६ रोजीचे आदेश.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातील नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या असतिलच.

सर्व निवडणूक निरीक्षकांनी (मुख्य निवडणूक निरीक्षकांसह) निवडणुकीच्या काळात (नामनिर्देशनापासून निकाल लागेपर्यंत) त्यांना नेमून दिलेल्या नगर परिषदा/नगर पंचायतींना वेळोवेळी भेटी देऊन सर्व आवश्यक बाबींवर लक्ष ठेवावयाचे आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या तपासणी सूची नुसार निवडणुकीच्या तयारीची माहिती निवडणूक निरिक्षक यांना संबंधित नगर परिषदा /नगर पंचायतींनी द्यावी. निवडणूक निरिक्षक यांनी द्यावयाच्या अहवालामध्ये एकवाक्यता असावी

याकरिता सोबतच्या **<u>परिशिष्ट - १ ते ३</u>** विहीत केले आहेत. या नमुन्यांनुसार टप्पा निहाय आढावा घेवून अहवाल निवडणूक निरिक्षक यांनी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करावा. सदर परिशिष्टांव्यतिरिक्त अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास ती वेगळ्या पृष्ठावर मुद्दे निहाय सादर करता येईल.

संबंधित नगर परिषदा / नगर पंचायतींच्या संदर्भात एखादी घडलेली घटना किंवा उधवलेल्या प्रसंगाविषयी आपण जास्तीची माहिती सोबत सादर करावी.

आपला,

०८.११.२०१६

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- संबंधील निवडणूक निरीक्षक यांना आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# तपासणी सूची (Check List)

निवडणूक निरीक्षकांकरिता नगरपरिषद/नगरपंचायतीने उपलब्ध करून दयावयाची माहिती

**नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव :-**

१. निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकाऱ्याची नांवे व संपर्क क्रमांक :-

२. प्रभागांचे क्षेत्र व नकाशासह तपशील (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)

३. मतदान केंद्रांची एकुण संख्या व त्यापैकी निवडणूक निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मतदान केंद्रांची संख्या

४. निवडणूक निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या संवेदनशील / अतिसंवेदनशील मतदान केंद्रांचा तपशील

५. निवडणुकीकरिता आवश्यक असलेला अधिकारी /कर्मचारीवर्ग यांची संख्या

६. निवडणुकीकरिता आवश्यक असलेले निवडणूक साहित्य -
मतदान यंत्रे - , पेपर सील - ,पट्टी सील- ,
स्पेशल टॅग- , मार्कर पेन- , काढता येणाऱ्या मेमरी-
बॅटरी- ,
इतर आवश्यक महत्वाचे साहित्य -

७. मतदान यंत्रांची तपासणी -

८. साहित्य वाटप केंद्राचे ठिकाण-
संकलन केंद्राचे ठिकाण -
मतमोजणी केंद्राचे ठिकाण-

९. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता केलेली कार्यवाही -

१०. आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने केलेली कार्यवाही -

११. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या बैठका -

१२. उमेदवारांचा निवडणूक खर्च तपासण्याकरिता केलेली उपाययोजना-

१३. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी इत्यादींकरिता आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण-

१४. मतपत्रिका छपाईकरिता केलेली व्यवस्था -

१५. स्ट्राँग रुम व्यवस्था

मतदानाचा दि......................
उमेदवारांची यादी अंतिम होण्याचा दिनांक ........
रात्री मुक्काम दिनांक ...............

# परिशिष्ट -१

## निवडणूक निरीक्षक यांचा पहिला अहवाल

(उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या आदल्या दिवशी (पूर्वसंध्येस) मुक्काम करुन उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या कार्यवाहीवर लक्ष ठेवण्याबाबत)

(निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यावर तात्काळ विभागीय आयुक्तांस पाठविणे)

नगरपरिषद-: नगरपंचायतीचे नाव/

भ्रमणध्वनी क्रमांक-:

निवडणूक निरीक्षकाचे नाव -:

छाननीचा दिनांक -:

| अ. क्र. | विषय (चिन्ह वाटप) | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| १. | (i) एकूण किती नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती?<br>(ii)अंतिमरित्या स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनत्रांची संख्या<br>(iii)नामनिर्देशनपत्रे शपथपत्रांसह संगणकीय प्रणालीद्वारे अपलोड करण्यात आली किंवा कसे ? | |
| २. | (i) छाननीमध्ये किती नामनिर्देशनपत्रे फेटाळण्यात आली?<br>(ii) नामनिर्देशनपत्र नाकारल्याबाबत लेखी तक्रारी प्राप्त झाल्या असल्यास त्यांची संख्या (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)<br>(iii) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या अपिलांची संख्या | |
| ३. | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडील नामनिर्देशनपत्रांच्या छाननीबाबत तक्रारी आहेत किंवा कसे ? | |
| ४. | उमेदवारी मागे घेण्याच्या आदल्या दिवशी (दि............) रात्री नगरपरिषद क्षेत्रामध्ये राऊंड घेऊन संशयास्पद ठिकाणी भेटी दिल्या किंवा कसे. अशा ठिकाणांची संख्या व तपशील | |
| ५. | त्या दिनांकास कोणत्या प्रकारच्या अनपेक्षित / आक्षेपार्ह अशा घटना निदर्शनास आल्या किंवा कसे. आल्या असल्यास त्याचा तपशील | |
| ६. | उमेदवारी मागे घेण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत किंवा कसे. त्याचा तपशील | |

| | | |
|---|---|---|
| ७. | निवडणूक निरीक्षकांच्या भेटीबद्दल<br>(i) प्रसिध्दी देण्यात आली होती किंवा कसे<br>(ii) तक्रारी, निवेदने देण्याबाबत सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात आली होती किंवा कसे ?<br>(iii) आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जनतेकडून प्राप्त तक्रारींचे निराकरण होईल याबाबत जनतेस आश्वस्त करण्याकरिता केलेल्या उपाययोजना<br>(iv) त्यांच्याशी संवाद साधून माहिती घेतली किंवा कसे ? | |
| ८. | उमेदवारी मागे घेण्याच्या आदल्या रात्री गस्तीच्या कालावधीमध्ये अनधिकृत मद्य वाटप, पैसे वाटप किंवा मोफत वस्तू वाटप इ.चे प्रसंग आढळून आले किंवा कसे ? (असल्यास त्यांची संख्या व तपशील) स्टॅटीस्टीक व्हिजिलन्स टीम व भरारी पथक यांच्याबाबत माहिती घेतली किंवा कसे. रोख रकमा, तारण, इ.बाबत बँकांसोबत बैठका घेण्यात आल्या होत्या किंवा कसे ? | |
| ९. | संबंधित यंत्रणांकडून सर्व प्रकारची माहिती घेण्याबाबत केलेली तजवीज केलेली आहे किंवा कसे<br>(i) आचारसंहिता भंग, पेड न्यूज, मद्यवाटप याबाबत सर्वसाधारण जनतेकडून तक्रारी किंवा सूचना प्राप्त झाल्या किंवा कसे. त्यांची संख्या व तपशील<br>(ii) निवडणूक संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे.<br>(iii) या समितीच्या किती बैठका घेण्यात आल्या आहेत.<br>(iv) संनियंत्रण समितीने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यात माहिती (मुद्दा क्र.९.३)<br>(v) पेड न्यूज समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे?<br>(vi) राजकीय पक्षांची बैठक घेण्यात आली आहे किंवा कसे?<br>(vii) राजकीय पक्षांना निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात आले आहे किंवा कसे ? | |
| १०. | आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी | |

दिनांक :

निवडणूक निरीक्षकांची सही

ठिकाण :

| |
|---|
| मतदानाचा दि........................ |
| प्रचार कालावधी :- दि........... ते दि.......... |
| भेटीचा कालावधी:- दि..........ते दि.......... |
| रात्र मुक्काम दि............. |

# परिशिष्ट - २

## निवडणूक निरीक्षक यांचा दुसरा अहवाल

### मतदानापूर्वी प्रचारादरम्यान कमीत कमी २ दिवस, दोन रात्री सलग मुक्काम करुन प्रचार मोहीमेवर लक्ष ठेवणेबाबत

नगरपरिषद-: नगरपंचायतीचे नाव/
निवडणूक निरीक्षकांचे नाव -:
भ्रमणध्वनी क्रमांक-:
प्रशिक्षणाचा दिनांक -:

| अ.क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| | **प्रचार मोहीम** | |
| १. | कोणकोणत्या ठिकाणी भेटी दिल्या ? व त्या ठिकाणी किती वेळ उपस्थित होता? | |
| २. | तक्रारींचे निवारण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या? उदा :-<br>(i) कक्ष<br>(ii) तक्रार निवारण अधिकारी<br>(iii) इतर | |
| ३. | नगर परिषद/नगर पंचायतींच्या स्तरावर पोलीस, दारुबंदी अधिक्षक, वाहतूक अधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्यात आली का? | |
| ४. | स्थानिक पोलीस अधिकारी यांनी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांचा तपशील | |
| ५. | आदर्श आचारसंहितेच्या भंगासंदर्भात गंभीर तक्रारी आल्या असल्यास त्याचा थोडक्यात तपशील व परवानगी न घेता प्रचार मिरवणूक, प्रचार सभा झाल्या का? झाल्या असल्यास त्यावर काय कार्यवाही करण्यात आली? | |
| ६. | प्रचारादरम्यान सोशल मिडीया सेल स्थापन करुन त्याची तपासणी व रिपोर्टींग होत आहे काय? याबाबत तक्रारीची नगरपालिकानिहाय संख्या नमूद करावी. | |
| ७. | पेड न्यूजसंबंधात यंत्रणा कार्यन्वित आहे काय? वर्तमानपत्रातील बातम्यांची तपासणी झाली आहे किंवा कसे? अशा बातम्यांची संख्या | |

| | | |
|---|---|---|
| ८. | सार्वजनिक मालमत्तेवर प्रचार साहित्य लावलेले दौऱ्यादरम्यान आढळून आले काय? असल्यास कार्यवाहीसंदर्भात दिलेल्या सूचना व केलेल्या कार्यवाहीचा तपशिल नमूद करावा. | |
| ९. | आचारसंहिता भंगाच्या किती तक्रारी निवडणूक निरीक्षक या नात्याने आपल्याकडे प्राप्त झाल्या? याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा थोडक्यात अहवाल. | |
| १०. | मतमोजणी केंद्र, स्ट्राँग रुम, स्वीकार केंद्र, इत्यादींची व्यवस्था काय असेल याचा आढावा घेतला काय? | |
| | **प्रशिक्षणाबाबत** | |
| ११. | कोणकोणत्या प्रशिक्षण केंद्रांना भेटी दिल्या? प्रशिक्षण व प्रशिक्षणार्थींची संख्या | |
| १२. | (i) एकूण किती प्रशिक्षणार्थी होते व त्यापैकी किती अनुपस्थित होते?<br>(ii) अनुपस्थित प्रशिक्षणार्थींवर तात्काळ कारवाई करण्यात आली किंवा कसे? | |
| १३. | पुरेसे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी उपलब्ध होते किंवा कसे? | |
| १४. | सर्व आवश्यक मुद्दयांवर योग्य प्रशिक्षण देण्यात आले किंवा कसे? उदा.-<br>(i) मतदान केंद्र स्थापना,<br>(ii) मतदान यंत्राचा वापर व प्रात्यक्षिक (बहुसदस्यीय व थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने)<br>(iii) तक्रारी/आचारसंहिता उल्लंघन/ कायदा व सुव्यवस्था इत्यादी प्रसंग हाताळण्याबाबतचे मार्गदर्शन, इत्यादी.<br>(iv) मतमोजणी | |
| १५. | सर्व मतदान केंद्रे शासकीय इमारतीत आहेत किंवा कसे. त्यांची संख्या | |
| १६. | सुव्यवस्थित मतदान केंद्र, शौचालय, पिण्याचे पाणी, अखंडित वीज सेवा, रॅम्प याबाबत | |
| १७. | वाहनांची संख्या (सरकारी, भाडेतत्वावर) | |
| १८. | ईव्हीएम ठेवण्याकरिता स्ट्राँगरुमची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे | |

| | | |
|---|---|---|
| १९. | मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता करण्यात आलेली उपाययोजना (विद्यापीठे, महाविद्यालये, बँका, रेस्टॉरंट इ.ची मदत घेण्यात आली असल्यास त्यांची संख्या) | |
| २०. | पोस्टर, बॅनर इ. योग्यरितीने आढळून आले आहेत किंवा कसे ? त्यांची संख्या | |

दिनांक :

निवडणूक निरीक्षकांची सही

ठिकाण :

| |
|---|
| मतदानाचा दिनांक :- |
| प्रचार कालावधी :- दि............ ते दि...... |
| भेटीचा कालावधी :- दि. ............ ते दि. .... |
| रात्र मुक्काम :- दि. ............ |

# परिशिष्ट - ३

## निवडणूक निरीक्षक यांचा तिसरा अहवाल

(मतदाना पूर्वी दोन दिवस आधी पासून मतमोजणी पर्यंत मुक्काम करुन निवडणूक प्रकियेवर लक्ष ठेवणेबाबत)

नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव :-

निवडणूक निरीक्षकांचे नाव :-

भ्रमणध्वनी क्रमांक:-

भेटीचा दिनांक :-

| अ.क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल | |
|---|---|---|---|
| | | सदस्य पदाकरिता (न.प. / न.पं.) | अध्यक्ष पदाकरिता (न.प. मध्ये थेट निवड) |
| **मतदाना पूर्वी (२ दिवस पूर्व रात्र)** | | | |
| १. | मतदान यंत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेची तपासणी | | |
| २. | मतदान यंत्रे मतपत्रिका लावून तयार करण्याचे स्थळ | | |
| ३. | मतदान यंत्रे तयार करण्यासाठी राजकीय प्रतिनिधी उपस्थित होते काय? असल्यास दोन प्रतिनिधींची नावे, पक्ष व मोबाईल क्रमांक नमूद करावीत. | | |
| ४. | तयार केलेल्या मतदान यंत्रांची सिलींग प्रकिया व्यवस्थित पार पाडली आहे काय? | | |
| ५. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी १०% मतदान यंत्रे स्वत: तपासली आहेत काय? | | |
| ६. | निवडणूक निरीक्षक यांनी ५ मतदान यंत्राची रँडमली तपासणी करुन ती व्यवस्थित काम करीत असल्याबाबत अहवाल द्यावा. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | (i) एकूण मतदान केंद्रांची संख्या<br>(ii)प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या मतदान यंत्रांची संख्या<br>( CU व BU)<br>(iii)राखीव मतदान यंत्रांची संख्या | | |
| **मतदानाचा दिवस (पूर्व रात्र)** | | | |
| ८. | मतदानाच्यादिवशी कोणकोणत्या मतदान केंदांना भेटी दिल्या ? | | |
| ९. | मतदान केंद्रावर मतदारांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होत्या किंवा कसे? उदा :-<br>(i) रॅम्प<br>(ii) पिण्याचे पाणी<br>(iii) प्रसाधनगृहे, इत्यादी. | | |
| १०. | (i) मतदान केंद्रांवर रांगा होत्या किंवा कसे?<br>(ii) मतदान केंद्रांवर पुरेशा प्रमाणात पोलीस बल उपलब्ध होते का?<br>(iii) मतदान यंत्रे सुरळीत सुरु होती किंवा कसे, मतदान यंत्र बदलण्यात आल्यासंदर्भातील घटना | | |
| ११. | (i) मतदाना दरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील<br>(ii) भेटीच्यावेळी कोणकोणते झोनल अधिकारी भेटले? | | |
| १२. | संध्याकाळी कोणत्या स्वीकार केंद्रावर उपस्थित होता? सर्व मतदान केंद्रावरील मतदान साहित्य स्वीकार केंद्रावर सुरक्षित प्राप्त झाले किंवा कसे? | | |
| १३. | मतदान यंत्रे ठेवण्याची स्ट्रॉंग रुम सुस्थितीत असल्याबाबत खात्री केली आहे काय? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | राजकीय प्रतिनिधींसमोर स्ट्राँग रुममध्ये मतदान यंत्रे ठेवली गेली काय? | | |
| १५. | यावेळी उपस्थितीत २ प्रतिनिधींची नावे, पत्ता व मोबाईल क्रमांक नमूद करावेत. | | |
| | **मतमोजणी** | | |
| १६. | (i) मतमोजणीच्यावेळी कोणकोणत्या केंद्रांना भेटी दिल्या?<br>(ii) मतमोजणीच्या ठिकाणी किती टेबल लावण्यात आली होती?<br>(iii) निकाल पत्रकारांना मिळण्याकरिता सुविधा होती का? | | |
| १७. | सर्व मतमोजणी केंद्रावरील मतमोजणी प्रक्रिया योग्य रित्या पार पाडण्यात आली किंवा कसे? | | |
| १८. | मतमोजणी सुरु झाल्यानंतर तहकूब करावी लागल्यास त्यासंदर्भातील घटना | | |
| १९. | मतमोजणी दरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील | | |
| २०. | मतमोजणीनंतर काढता येणाऱ्या मेमरी कोषागारात ठेवण्याकरिता करण्यात आलेली व्यवस्था | | |

**दिनांक :** **निवडणूक निरीक्षकांची सही**

**ठिकाण :**